# भक्तीचे बीज

## सत्पुरुषांच्या पुण्यतिथी दिवशी त्यांच्या नावाचा नुसता जयजयकार केल्याने आपल्याला त्यांच्याविषयी वाटणारा आदर, भक्ती आणि कृतज्ञता व्यक्त होऊ शकत नाही. त्याकरिता या शब्दांचा गूढार्थही समजून घेतला पाहिजे.

हिंदू संस्कृतीतील काही मोजक्या सत्पुरुषांना त्यांच्या निर्वाण दिवशीला तिथीचा मान मिळण्याचं भाग्य लाभल्याचं आढळतं. समर्थ रामदास यांच्या पुण्यतिथीला दासनवमी, संत एकनाथांच्या पुण्यतिथीला नाथषष्ठी आणि संत तुकाराम महाराजांच्या पुण्यतिथीला तुकाराम बीज म्हणतात. अनेक वर्षांपूर्वी फाल्गुन मासाच्या कृष्ण पक्षातल्या द्वितीयेला संतश्रेष्ठ जगद्‌गुरू तुकाराम महाराजांचं सदेह वैकुंठ गमन झालं आणि त्यानंतर या तिथीलाच तुकाराम बीज या नावाने ओळखलं जाऊ लागलं. अगदी अलीकडच्या काळातील दोन सत्पुरुषांची पुण्यतिथीसुद्धा याच दिवशी साजरी होते. त्यातले एक म्हणजे मालवणचे प.पू. साटम महाराज आणि दुसरे प.पू. नीळकंठ (भाऊ) महाराज करंदीकर. भिन्न काळात आणि भिन्न स्थळी कार्य असलेल्या या तीनही सत्पुरुषांमधलं एक विलक्षण साम्य म्हणजे हे तिघेही असामान्य भक्त होते. हिंदुस्थानी अध्यात्मातली भक्तीमार्गाची परंपरा महर्षी नारदांपासून सुरू झाली. एका हातात चिपळ्या आणि एका हातात वीणा घेऊन ‘नारायण नारायण’ या मंत्राचा उद्‌घोष करीत अनेक शिष्यांना सन्मार्गाला लावण्याचं जे कार्य नारदमुनींनी सुरू केलं तेच ‘विठ्ठल विठ्ठल’ या नामाचा गरज करीत तुकाराम महाराजांनी पुढे चालवलं. आपल्या सद्‌गुरूंच्या म्हणजेच श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांच्या ‘नमो गुरवे वासुदेवाय’ या नामजपाचा ध्यास घेतलेले भाऊमहाराज किंवा ॐकाराचा मंत्र शिष्यांना देणारे साटम महाराज हेसुद्धा याच परंपरेतले.

सिद्धावस्थेमध्ये असणारे हे सत्पुरुष सतत लोकसंग्रह करून त्याद्वारे कर्माची गुंतागुंत आणि संसाराची असारता लोकाना सांगू पाहत होते आणि ईश्वराचे नामच सामान्य मनुष्याला नामरूपात्मक जगाच्या पलीकडे घेऊन जाऊ शकेल ही शिकवण देत होते. दुर्दैवाने सामान्य भक्तांना त्यांच्या उपदेशांचा नीटसा अन्वयार्थ लावता आला नाही. त्यामुळे प्रापंचिक सुखांच्या अपेक्षांच्या मर्यादांपलीकडे पोहोचलेल्या या सत्पुरुषांवर अनेक वेळा टीका झाल्याचे, त्यांची निंदा, अवहेलना घडल्याचे अनेक प्रसंग त्यांच्या चरित्रात आढळून येतात. शिष्याला लवकरात लवकर संसार बंधनातून मुक्त करण्यासाठी संत तुकारामांनी एका शिष्याला अनुग्रहाचा मंत्र दिला ‘न मिळो खावया, न वाढो संतान, तरी हा नारायण कृपा करो!’ सामान्यजनांना या विचित्र आणि विलक्षण अनुग्रहामागचा अर्थबोध त्या काळातही कधी समजू शकला नाही आणि आजच्या काळातही तो समजणं अवघड आहे. सामान्य मनुष्य स्वत: प्रपंचाच्या चिंतेत अडकतोच शिवाय दुसराही लवकरात लवकर त्यात कसा अडकेल याचीही चिंता करतो. त्यामुळे सत्पुरुषांच्या, ‘प्रपंचातील दु:खे ही आपल्याच पूर्वकर्मांचा परिणाम असल्याने, केवळ प्रापंचिक सुखांमध्ये ईश्वराची कृपा शोधू नका’ या उपदेशातलं असामान्यत्व लक्षात न घेता क्षणभंगुर सुखाच्या मागे लागून मुक्तीच्या परमानंदाला पराङ्‌मुख होतो.

सत्पुरुषांच्या पुण्यतिथी दिवशी त्यांच्या नावाचा नुसता जयजयकार केल्याने आपल्याला त्यांच्याविषयी वाटणारा आदर, भक्ती आणि कृतज्ञता व्यक्त होऊ शकत नाही. त्याकरिता या शब्दांचा गूढार्थही समजून घेतला पाहिजे. ‘ज्ञ’ म्हणजे ज्ञान आणि ‘कृत’ म्हणजे कृती. अर्थात ज्ञानपूर्वक केलेली कृती म्हणजे कृतज्ञता! खरी कृतज्ञता जर व्यक्त करायची असेल तर प्रथमत: सत्पुरुषांच्या जीवनचरित्राचा सखोल अभ्यास करून त्यांचा उपदेश समजून घेतला पाहिजे. त्यानंतर तो कृतीद्वारे आचरणातही आणला पाहिजे. यासाठी आवश्यकता असते ती एकनिष्ठ संकल्प करण्याची. बरेच लोक या फांदीवरून त्या फांदीवर जितक्या सहजतेने एखादा पक्षी उड्या मारतो, तितक्याच चंचलतेने आपली निष्ठा बदलताना दिसतात किंवा लोकनिंदेसमोर टिकता न आल्यामुळे संकल्पापासून परावृत्त होतात. संकल्पयुक्त कृती करताना या सत्पुरुषांनी दिलेल्या नामजप अथवा इतर साधना करण्याबरोबरच आपल्याला त्यांनी केलेल्या मानवसेवेचाही आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अनेक देहांनी विराजमान झालेल्या त्या वैश्विक शक्तीची सेवासुद्धा करता आली पाहिजे. असा कृतीयुक्त संकल्प जर आपण करू शकलो तर वैश्विक शक्तीशी एकरूपत्व पावलेल्या या सत्पुरुषांचं चेतनतत्त्व निश्चितपणे प्रसन्न होऊन आपल्याला उत्तम भक्ती, उत्तम साधना, उत्तम सेवा आणि उत्तम तप करण्याची स्फूर्ती आजही देऊ शकतं.

बीज म्हणजे द्वितीया. पण या शब्दात अजून एक अर्थ दडलेला आहे. या तीनही सत्पुरुषांनी आपापल्या पद्धतीने भक्तीबीजाचं रोपण करण्याचं उत्तम सत्कार्य केलं आहे. आता या बीजाला अस्तंगत करायचं की त्याचं रूपांतर खुरटलेल्या झुडुपात करायचं की त्याचं उत्तम पालनपोषण करून त्याचा अनेकांना छाया देणारा महावृक्ष निर्माण करायचा याचं चिंतन तुकाराम बीजेनिमित्त प्रत्येकाने करणं आवश्यक आहे.

- बापट गुरुजी

सामना उत्सव रविवार पुरवणी गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा



Ads by Guruji




Ads by Guruji

